
# शब्दांमृत®

भाग–३

विलास जैन



हे कार्य नाही क्रांती आहे

# समर्पन

हा शब्दांमृत काव्यसंग्रह

सर्मपीत आहे,

निसर्गाच्या त्या रक्षकांसाठी

जे ह्या धरतीला

त्यांची संपत्ती नाही,

तर त्यांच्या भावी पिढीची

ठेव मानतात.

आपणा पासुन मला प्रेरणा मिळते

विलास जैन

## अल्प परिचय -

### विलास जैन

विलासभाऊ जैन यांचा जन्म एका छोट्याश्या खेड्यात झाला. खेडे गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांना छोट्या वयातच गाव सोडून शहरात शिक्षणासाठी जावे लागले. त्यांना कोणाचेही मार्गदर्शन नसतांना त्यांनी शिक्षणाचे माहेरघर पुणे येथून एका नामवंत संस्थेतून १९८८ साली एम्.बी.ए. (मार्केटींग) या विषयात शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर स्वत:चा चिपकविण्याचे पदार्थ विकण्याचा एक आगळा वेगळा व्यवसाय सुरु केला. सुरुवातीला फक्त विक्रीचा व्यवसाय केला व त्यानंतर त्या वस्तू स्वत: बनविण्याचा कारखाना टाकला. त्यांचे अभ्यासू व्यक्तिमत्व असून आज ते एक दूरदर्शी प्रगतशील उद्योजक आहेत. त्यांनी चिपकविण्याच्या विषयात चार शोध लावलेत व अनेक उत्पादने स्वत: तयार केलीत. आज ते एक सफल उद्योजक, संशोधक, शेतकरी, समाजकारणी व राजकारणी तर आहेत; पण एक उत्कृष्ट साहित्यिक देखील आहेत. त्यांचे लिखाण हिंदी व मराठी भाषेत असून संपूर्ण लिखाण समाजपयोगी, सुसंस्कार घडविणारे, प्रेरणा देणारे, अध्यात्मिकतेचा आधार असलेले व नैतिक मूल्य मनावर बिंबवणारे आहेत. त्यांनी हिंदी व मराठी दोन्ही भाषेमध्ये बालकविता, प्रेरणा कविता, देशभक्तीपर कविता, विडंबन कविता, कव्वाली, दोहे, प्रेरणा शायरी, सुविचार, सिनेगित, उखाणे, भजन, आध्यात्मिक कविता, ग्रह ताऱ्यांवरील कविता, समाज रचनेवरील कविता, छोट्या शिक्षाप्रद गोष्टी आणि मराठी गझल लिहलेल्या आहेत. त्यांची एकूण दहा पुस्तके प्रकाशित व दोन प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांची सामाजिक, राजकीय व अध्यात्मिक विषयाची दीर्घ वाटचाल त्याबरोबर खेड्यात तसेच शहरातील वातावरणात घालवलेली वर्षे त्यांना आपल्या लिखाणात फार महत्त्वाचे ठरलेली आहेत. निसर्गाशी जिवापाड प्रेम असल्यामुळे त्यांनी हजारो वृक्ष लावलेली आहेत आणि लिखाणापासून मिळणारा सर्व पैसा निसर्ग संर्वधना करीता वापरण्याचा प्रण त्यांनी केलेला आहे.

# शब्दांमृत®

भाग-३


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन | : | प्रथम |
| प्रकाशक | : | विलास जैन |
| लेखक | : | विलास जैन |
| प्रति | : | |
| अक्षरांकन | : | विलास जैन |
| निर्मित | : | विलास जैन |
| मुद्रक | : | |



© All Right Reserved 2020
New Era Self Help Marketing India Ltd. is registered in India under Public Ltd. Company
Act 1956 Reg. No. U51909 MH2002 PLC 138100

सर्वाधिकार :

या कविता संग्रहातील सर्व भाग, चित्र, लिखाण पूर्व परवानगीशिवाय पुनर्मुद्रित केले जाणार नाहीत. या प्रकाशनाबाबत अनधिकृत काही प्रकाशन आढळल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर कायदेशीर कारवाई केली जाईल.


हे कार्य नाही क्रांती आहे

# प्रस्तावना

जीवनात संघर्ष करते वेळी अनेक कविता, काही शब्दसमूह व सुविचार, आपली लढण्याची शक्ती वाढवितात. हारत असलेली आपली बाजू जिंकण्यात, आपला आत्मविश्वास, वाढविण्यास असे साहित्य आपली मदत करतात. जीवनातल्या अनेक वळणावर ते आपल्याला चांगले मार्ग दाखवितात आणि आपल्याला जीवन जगण्याची प्रेरणा देतात. मला माझ्या जीवनात चांगल्या मार्गावर चालण्या करीता, विचलित न होण्याकरीता असे अनेक साहित्य मार्गदर्शक महत्वाचे ठरले आहेत. त्यापासूनच प्रेरणा घेऊन मी विचार केला की, मी पण काही असे स्वअनुभवावर आधारीत शब्दसमूह तयार करावे जे जखमेवर मलम, टॉनिक व मार्गदर्शकाचे काम करतील. जे कुणी विचलीत होऊन चुकीच्या मार्गावर गेलेले आहेत त्यांना असे साहित्य चांगल्या मार्गावर आणण्यास मदत करतील. आज जर आम्ही बघितले तर आजच्या सांस्कृतिक प्रदूषणाच्या जीवनात या सर्व वस्तुंचे महत्व पहिल्या पेक्षा जास्त महत्वाचे आहे. कारण आता तुम्हाला मार्गावरुन भटकविण्यासाठी घरातच टि.व्ही. हे माध्यम आहे. ई-मेल, सोशलाईजींग मिडिया व एस.एम.एस. व्दारे आता सहजपणे कुणालाही काही न कळू देता भरपूर असामाजिक गोष्टी करता येऊ शकतात. पूर्वी प्रत्येकाचे जीवन हे संस्कार, नीतिमूल्ये, आदर, लाज व त्याग यांच्या धाग्यात बांधलेले असायचे. पण आता या आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स् मिडियाच्या आगमनाने या सर्व गोष्टींची बंधने तुटलेली आहेत. आता आपल्याला काय खायचे?, काय प्यायचे?, कसं दिसायचं?, कसं वागायचं?, काय विकत घ्यायचं? हे सर्व इलेक्ट्रॉनिक्स् मिडिया आपल्याला शिकवीत आहे. इतकचं नाही तर आपले नाते-संबंध कशी असावित हे सुद्धा अनेक मालिकांद्वारे आपल्या सुप्त मनात बसविण्याचे काम सुरु आहे. मला आशा आहे की, या पुस्तकातील काही सुविचार, कविता आपल्याला विचलित होण्यापासून थांबवितील व जिवनात काही गोष्टीकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलवतील. जर का तुम्ही जीवनात हारलेले असाल, विखुरलेले असाल तर यातील काही कविता तुमच्यासाठी संजीवनीचे काम करु शकतात आणि तुम्हाला यापासून काही लाभ झाला तरच मला असे वाटेल की, माझे लिखाण सार्थक ठरले.

आपला विनम्र

विलास जैन

# शब्दांमृत®

भाग–३

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. | अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | वेदना माझ्या | ... १ | १५. | हुर हुर | ... १५ |
| २. | नड रे बेट्या तू नड | ... २ | १६. | बळीराजा | ... १६ |
| ३. | फक्त तुझ्यासाठी | ... ३ | १७. | काळ | ... १७ |
| ४. | बायको नावाचं गणित | ... ४ | १८. | कार्यकर्ता | ... १८ |
| ५. | मनातील वादळ | ... ५ | १९. | शरीर संबंध | ... १९ |
| ६. | शब्द | ... ६ | २०. | सेक्सी | ... २० |
| ७. | ह्दयाची भाषा | ... ७ | २१. | श्रद्धांजली | ... २१ |
| ८. | उपमा | ... ८ | २२. | धिर | ... २२ |
| ९. | साथ | ... ९ | २३. | अकस्मित | ... २३ |
| १०. | जड झाले ओझे | ... १० | २४. | श्रावण | ... २४ |
| ११. | दिल थोड थांब जरा | ... ११ | २५. | भिकारी | ... २५ |
| १२. | कागदाच्या तुकड्यावर | ... १२ | २६. | निशिगंध | ... २६ |
| १३. | माझ्या प्रिय युवक मित्रा | ... १३ | २७. | म्हातारा | ... २७ |
| १४. | बाळ | ... १४ | २८. | प्रिय ताईस | ... २८ |

# वेदना माझ्या

हृदयातील स्पंदनांना फुलवून
तर कधी श्वास माझा रोखून
कधी वर वर तर
कधी खोल शिरल्या ...वेदना माझ्या

डोळे माझे उघडून
तर कधी स्वप्न माझे उधळून
कधी पाहिल्या तर कधी
अनुभवल्या ...वेदना माझ्या

पाय माझे झिझवून
तर कधी घाम माझा गाळून
कधी ओल्या तर
कधी सुकल्या ...वेदना माझ्या

भान माझे हरवून
तर कधी चित्त माझे वेधून
कधी हिरमुसल्या
तर कधी गहिवरल्या ...वेदना माझ्या

रक्त माझे शोसून
तर कधी भावना माझ्या चिरडून
कधी कुरतडल्या तर
कधी ओरबडल्या ...वेदना माझ्या

विलास जैन

# नड रे बेट्या तू नड

सुरवातीला काढ थोडीशी कळ
पण झालाच कोणी अवजड
तर नड बेट्या तू नड

कोणासाठी जरूर बोंबल किंवा रड
चांगलाच असेल कोणी तर सड
पण झाला कोणी थोडासाही वरचढ
तर नड बेट्या तू नड

सुरु राहू दे पुरुषार्थाची सळसळ
शांत नाही, राहू दे वळवळ
पण झाला कोणी डोईजड
तर मग नड बेट्या तू नड

अंगावर पडू दे मेहनतीचे वळ
नेहमी आपल्या अधिकारासाठी तू लढ
पण जर केली कोणी गडबड
तर मग नड बेट्या तू नड

अबोला नाही, करायची बडबड
ओकून दे भावनेची मळमळ
पण केला जर कोणी छळ
तर नड रे बेट्या तू नड

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# फक्त तुझ्यासाठी

हे बांध आसवांचे
तुझ्याचसाठी साठवले
हे शिखर हिम नगाचे
तुझ्याचसाठी गोठवले

वाहतील पाट भावनांचे
दुःख तुझे जर कळले
पाझरतील हिम शिखर हे
काळजाचे तार जर जुळले

डोळ्यात तुझ्या डोह दुःखाचे
बघताच मला समजले
प्रत्येक क्षणात रहस्य सुखाचे
का गणित तुला ना उमजले

सोड साम्राज्य दुःख दलदलीचे
का जाळे स्वत:भोवती विणले
दिवस तुझे स्वप्न बघण्याचे
का डोळे तुझे शिणले

सांगतात शब्द हे मनाचे
जे आले नभासम भरले
स्पर्श अनुभवता या हाताचे
क्षितीजा वरती उडले

विलास जैन

# बायको नावाचं गणित

बायको नावाचं गणित
पाहिजे तसं केव्हाच नसतं
जेव्हा हसायचं असतं
तेव्हा रूसतं
आणि सगळ काही फसतं

बायकोच्या टोमण्याला कधी
गंभिरतेने घ्यायचं नसतं
कारण त्या टोमण्यामध्ये जिव्हाळा असतो
बदला घ्यायचा मानस नसतो

एकाच चेहऱ्याला वेगवेगळ्या प्रकारे
अनुभवून शिकायचं असतं
सजून धजून ती तुझी वाट बघेल
हा गैरसमज टाळायचा असतो

बायको नवऱ्याच्या अमर प्रेमकथा
असं काही जगात नसतं
म्हणून समोरच्या जोडप्याला
बघून मनसोक्त जळायचं नसतं

विलास जैन



# मनातील वादळ

मनातील वादळाला
कसा करू मी शांत
गरगरणाऱ्या भवऱ्याला
कसे करु पादाक्रान्त

वेळी अवेळी मनातील
वाहणारे हे वारे
भिरकटू लागल्या भावना
बेजार नाते नाजूक सारे

नव्हते क्रुर एवढे कधी
मनातील हे निखारे
विचारांच्या गोंधळात का
न मिळावे कोणते सहारे

का असावा हव्यास
मनाला जग जिंकण्याचा
एक क्षण खूप असतो
जगण्यासाठी आनंदाचा

विलास जैन

# शब्द

शब्दानों या परत
करु नवी सुरुवात
हरवल्या होत्या कल्पना
हरवलो होतो संसारात

मैफील तुमचीच आवडते
रमत नाही मी कुणात
सांगा आता काय करु
सजवू कुणाला शब्दात

श्रृंगार रसात भिजवू
का नेऊ कुणा गगनात
साथ घालू दु:खी मना
घेण्या आनंद संसारात

पैजणाचा आवाज शब्दात बांधु
का रंगवु सुहागरात
शब्दांच्या मैफीली विना अपूर्ण राहिल
काही तरी या जगात

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# ह्दयाची भाषा


दु:खात तुझ्या भिजून मी
तुझ्या प्रेमात पडलो होतो
प्रार्थना आणि संवेदना माझ्या
दिव्या प्रमाणे तुझ्यासाठी जाळत होतो

ह्दयाची भाषा पोहचते तिच्याकडे
असा मी संभ्रमात होतो
समजेल ती पवित्र भावना
अशा मी आत्मविश्वासात होतो

काळाबरोबर भाषा बदलते
भावना नाही समजत होतो
व्यक्ती बरोबर शरीर बदलत
आत्मा नाही समजत होतो

बदललं प्रेम बदललली भावना
मी फालतू शब्दांशी खेळत होतो
प्रेमामध्ये सर्व काही शरीर
आता कळत न कळत मी शिकत होतो

विलास जैन



# उपमा

चंद्राची उपमा तुला काय देऊ
आहे डाग बघ त्याच्यात

चांदण्याही बघ काही काळ
चमकुन तुटून खाली पडतात


का नदी म्हणून तुला संबोधू
धुतात किती जण हात तिच्यात

तुझ्या डोळ्यांच्या गहराई पुढे
बघ सागराची काय बिशाद

हिरे माणके मोती यांची तुलना नाही
असतील बघ कित्येक तुझ्या खिशात

चंदनाची उपमा तरी काय देऊ
जात आयुष्य त्याच झिजण्यात

विलास जैन



## साथ

हरलो पडलो पराभुत झालो
रडलो कुठलो निराश झालो
मिणमिणत्या दिव्यासम विझण्यात आलो
पकलेल्या पानासम गळण्यात आलो

निरंतर येणाऱ्या संकटाला घाबरलो
लढतांना त्याच्याशी आता मी क्षिणलो
शक्तीहीन देह घेऊन धरतीवर पडलो
वाटले आता मी बघा संपलो

मंदमंद वाहणाऱ्या वाऱ्याने सावरलो
बाजुला जळणाऱ्या दिव्याने तापलो
ध्येय आठवून उठून बसलो
इतरांचे दु:ख बघून उभा राहिलो

आशेने चमकणारे डोळे बघून सुखावलो
ध्येय साध्य करण्यासाठी मी धावलो
मनाच्या शब्दाने उपचार करुन जगलो
पराभूत झालो होतो मी हे विसरलो

विलास जैन

## जड झाले ओझे

का माझ्या प्रेमात
तू एवढी मजबुर
मी तयारी केली आहे
क्षितीजावर उडण्याची अतीदूर

मधुर संबंधाच्या जाळ्यात अडकलो
उडण्याची लागली मला हुरहुर
ओझे घेऊन येथवर आलो
बघ घासले माझे दोन्ही खुर

संबंधाचे ओझे जड झाले
उतरुन ठेऊ दे बाजुला दूर
शब्दांना प्रेमात आणि भावनात
डुंबऊन वाटते प्रत्येकाला भरपुर

स्वच्छंदतेचे दोन पंख लाऊनी
गिरक्या मारणार गगनात भरपूर
हसणार खेळणार नाचणार गाणार
गोवणार आध्यात्मिकतेचा सुरात सुर

व्यक्तीगत प्रेमास मी असाह्य
वाहतात हे प्रेमाचे पाट दूर दूर
अथांग प्रेमाचे सागर बनून
फेडणार जगाचे ऋण भरपुर

विलास जैन

NEW ERA'S
SELF HELP

# दिल थोडं थांब जरा

ऐ दिल थोड थांब जरा
घेऊदे थोडा विश्राम जरा
उमजू दे थोडे काम जरा
संगाती बघ तू माझा खरा.... ऐ दिल

खऱ्या दिलाला नाही येथे मुजरा
खोटे दिल करीतो सण साजरा
फिटले काजळ हरवला आहे गजरा
ठेव तुझा हा चेहरा हसरा.... ऐ दिल

बुद्धी म्हणते तुला थोडे सावरा
फुल समजतो येथे माळ्याला कचरा
बघ प्रेमाचा येथे संवाद बोचरा
दिल कोठे शोधतोस तू सहारा.... ऐ दिल

दिल नको फुलवुस आशेचा पिसारा
समज या निर्दयी दुनियेचा ईशारा
ऐकणार नाही हा समाज बहिरा
दिल नाही तुला बघ येथे निवारा.... ऐ दिल

विलास जैन

NEW ERA'S
SELF
HELP

# कागदाच्या तुकड्यावर

कागदांच्या तुकड्यासाठी
का विकली गेली बहीण
अन कुणाची माय
का बांधली गेली ही
कसायाच्या दारी कपीला गाय

साक्षात लक्ष्मीचं रुप तू
का वाकडे पडले पाय
वासनांध कुत्रे बोचकून खातील
तू तर दुधावरची साय

का निवडला हा विचित्र
गरिबी हटविण्याचा उपाय
श्रीमंत जरी झाली तरी
स्वाभिमानाचे काय?

पैशापेक्षा स्वाभिमान महत्वाचा
चांगला हा पर्याय
वासनेच्या वादळासमोर सांग
टिकतील का तुझे नाजूक पाय

किती जन्माचे पुण्य फलीत
मिळाला मनुष्य पर्याय
परीक्षा घेत असतो बघ देव
होऊ देत नाही काही अपाय

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP



# माझ्या प्रिय युवक मित्रा

माझ्या प्रिय युवक मित्रा
तुच आहे जगाची ऊर्जा
आणि तुच आहेस प्रेरणा

तुच आहेस म्हाताऱ्या
थरथरणाऱ्या हाताची काठी
तर तुच आहे आंधळ्या
आईच्या आशेची दृष्टी

नाही तू बारच्या अंधाऱ्या कोपऱ्यात
बसून नशेत लडखडण्याकरीता
तर आहेस तू तुझ्यातल्या वैशिष्ट्याच्या नशेत
लोकांना झिंग आणण्याकरीता

आहेस तू निसर्गाच्या प्रत्येक आनंद,
अल्हाद, उत्तेजना देणाऱ्या वस्तुची उपमा
कधी तू तळपणारा सुर्य आहेस
तर कधी मनाला शितलता देणारा चंद्रमा


तुच आहेस एखाद्या
बहिणीची राखी
तर बघ वाट पाहते
तुझी तुझ्या जन्माची सखी

नको पाहूस तू आया-
बहिणींकडे होऊन आधाशी
आहे तुझ्या करीताही
कुणीतरी सुंदरशी

सडसडणाऱ्या तुझ्या जिवाची
गरज आज समाजात प्रत्येकाला
बघ कोण दाखवेल आमची
महानता या जगाला

नको बांधुस स्वत: भोवती
स्वार्थाच्या कडेकोट भिंती
तुच आमचा सहारा
तुच आमचा संगाती

विलास जैन



# बाळ

बाळ राहिल बाळ किती काळ
तुटली आता याची आईशी नाळ


होतील याचे आता फार लाड
घेईल तो प्रत्येक दिवशी वाढ

इवल्याशा रोपट्याचे मग होईल झाड
झाडावर येतील मग खूप सारे फळ

मग घोंघावत एक दिवस येईल वादळ
सुरु होईल याची मग पानगळ

झडप घालेल याच्यावर एक दिवस काळ
कोलमडून पडेल एक दिवस हे सुकलेले झाड

विलास जैन



## हुर हुर

अंगा खांद्यावर खेळणारी
मुले झाली मोठी
जाऊ लागली दूर
बघा लागली कशी मला हुर हुर

निसर्गनियमापुडे आई बाप ही
बघा कशे मजबूर
तयारी करु लागले जाण्याची दूर
बघा लागली कशी मला हुर हुर

सहचरणिला आवडत होता
या बाहुचा सहारा
वेळ नाही तिला समजतो मी तिचा सूर
बघा लागली कशी मला हुर हुर

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# बळीराजा

बळीराजा थांब जरा
आत्महत्येचा मार्ग नाही खरा

थोडा धिर धर
पोहचेल मी तुमच्या घरा
देश आमचा मोठा
समस्येच्या विळख्यात वसुंधरा


तुमच्या करीताच बघ
मी बसलो दिल्ली दरबारा
बैल जोडी शेळी मेंढी
बघतो तुजला राबता शिवारा

संस्कृती आमची लढण्याची
नाही मरण्याची परंपरा
झटतो तुझ्याकरीता मी
रात्रंदिवस नाही आता निवारा

मी तुझाच सोबती
नाही कुणी माणुस दुसरा
तुझ्याकरीता रक्त माझे जळते
जसा होतो पाण्याचा निचरा

निघेल बघ समाधान
तुझ्या समस्येचा खरा
दिवस सुगीचे परत येतील
अल्हाद भरेल मनात वारा झोंबरा

विलास जैन



# काळ

काळ येईल असा
अक्राळ विक्राळ
भौतिक सुखसुविधेत
पडेल माणुसकिचा दुष्काळ


संबंधाच्या चिंधड्या फाडतांना
उघड्यावर दाखवेल हा नवाकाळ
हिंसा, वासना आणि लालसा
वेढेल माणसाला पूर्णकाळ

पशु ठरेल आदर्श
मानवतावादी ठरेल वेडा
समजणार नाही कोण
केव्हा कुणाचा दाबिल गळा

खाण्यासाठी जगणारे
खातील पोटचा गोळा
धर्माच्या नावावर व्यापार
करणारे शिकवतील नवा धडा

नग्नतेचा बाजार भरेल
भाग्यवान ठरेल आंधळा
जगू शकणार नाही
या दुनियेत दीन दुबळा

विलास जैन



# कार्यकर्ता

मला हवे असे कार्यकर्ते
जे असावे मानवतेचे पुरस्कर्ते

दृढ विश्वास स्पष्ट वक्ते
नसावे व्यसनी किंवा नाकर्ते

बघण्याचा त्यांचा नवा दृष्टीकोन
पसरवावे जातीय सलोख्याचे लोण

स्वार्थासाठी नाही राजकारण
सफल करावे त्यांनी समाजकारण

असावी देशासाठी कळकळ
व्हावी गरीबांकरीता त्यांना तळमळ

नेत्यावर दृढ निष्ठा असावी
त्यांचे जीवन प्रेरणा बनावी

स्वार्था अगोदर व्यवस्था बघावी
पदोपदी पदाची अपेक्षा नसावी

पक्ष म्हणजे स्वकार्य साधन नसते
नेत्यांच्या उत्पादनाचे मशिन नसते

असावी रास्त अपेक्षा नेत्यांशी
नाती जुळावी त्यांच्या ह्रदयाशी

विलास जैन

# शरीर संबंध

स्त्री पुरुष संबंधाचा
बघा कसा भरला बाजार
शरीराच्या या छोट्याश्या गरजेचा
किती वाढला हा आजार

श्रृंगार रसाने माखले स्त्री शरीराला
कामिनी बनविले यांनी मातेला
गरजांपेक्षा जाहीरात मोठी
तडा जाईल याने समाज रचनेला

उत्पत्ती विनाश मधला समतोल राखण्या
गरज स्त्री पुरुषाच्या शरीर मिलनाची
रंजक, रोचक, रोमाचंक, मादक
गरज नाही असे याला संबोधन्याची

अलिंगन, चुंबन आणि मिलन
भाषा ही आदर आणि समर्पणाची
का स्त्री पुरुषांच्या शरीरांचे विविध चाळे
नाही हो ही वस्तू फक्त उपभोगाची

सामुहिक आणि बहुजनान सोबत न व्हावी
अलौकिक ही गोष्ट एकनिष्ट होण्याची
चव घेऊन बघावी किंवा दाखववावी नाही अशी
गोष्ट ही आहे फक्त प्रकृतीत विलीन होण्याची

विलास जैन

# सेक्सी

सेक्सी म्हणविण्याकरीता
उताविळ तू का अशी
सौदर्यांचा बाजार मांडण्या
झाली तू वेडी कि पिशी


संरक्षण आणि आदर
देईल तुजला शालिनतेचे कवच
प्रक्षोभक हावभाव करुन
नको तू वासनांधाना डिवच

वखवखलेल्या नजरा झेलतांना
का तू खुश अशी
सुंदर लावण्याला तुझ्या
का टांगते असे वेशी

स्त्री सुलभ शालिनता जर का
तुझ्या मधली संपली
समज त्या क्षणी तू फक्त
शरीरसुख देण्याचे साधन बनली

स्त्री सामर्थ्य वरदान जगाला
तोडक्या कपड्यात मिरवू नको
आत्मसन्माला तुझ्या ठेच लागेल
गडे अशी तू वागू नको

विलास जैन



NEW ERA'S SELF HELP



# श्रद्धांजली

श्रद्धांजलीच्या तुमच्या दोन शब्दांची
गरज नाही त्याला आज याची
जिवंतपणी चांगले काम करतांना
साथ हवी होती त्याला तुमची

सात्वंना तुम्ही देण्याकरीता
उतावळे आज त्याच्या परिवाराला
विचार जर त्याचे जाणून घेतले असते
दिले असते त्यांनी दोन क्षण संसाराला

आत्म्याला त्याच्या शांती मिळण्याकरीता
आग्रह देवाचरणी तुम्ही आज धरता
जिवंतपणी काही वेळ शांत बसला तेव्हा
काहो त्याला तुम्ही हिणवता

आज वंदनीय व अनुकरणीय वाटतात
तुम्हाला त्याचे कार्य व आदर्श
हे समजविण्या करीता का द्यावे लागले
त्याला त्याच्या जीवनाचे सर्व वर्ष

मेल्या नंतरच्या श्रद्धांजलीपेक्षा
जिवंतपणी आदरांजली वाहावी
एखाद्याच्या कार्यावर विश्वास
दाखवून ती आपल्यातून डोकवावी

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# धिर

सहन शिलता संपली
आता किती धरु धिर
विचारांचे थैमान डोक्यात
कसे ठेऊ मन स्थिर

माणुसकीचे इंधन संपले
ममतेचा आटला झिर
कोठे जावे काय करावे
समोर अंधाराने भरलेली विहीर

प्रत्येक गोष्टीचा अतिरेक
सुन्न झाले शिर
भ्रष्ट वासनांध, हिंसक वृत्तीपुढे
समाजाचे झुकले शिर

NEW ERA'S SELF HELP

प्राण्यांपुढे मानवता लाजली
नमले लबाडापुढे शुरविर
गिधाडे घिरट्या घालू लागली
जिवंत माणसांच्या वस्तिवर

सुरक्षित आता काहीच नाही
पैशाची किंमत झाली माणसांच्यावर
समजत नाही कोण केव्हा
उठेल कोणाच्या जिवावर

विलास जैन

NEW ERA'S SELF HELP

# अकस्मित

अकस्मित अचानक बघून
डोके होते सुन्न
बदलणारे हे जग बघून
मन होते खिन्न

भय, चिंता, आनंद, उत्कंठा
शोक, क्रौर्य, घृणा, शुरता
वेढते मनाला क्षणोक्षणी
किती ही बघा विविधता

पात्र बदलतात सिन बदलतो
बदलते रोज जिवनाचे नाटक
सुसाट वेगाने येणाऱ्या वादळाला
उघडले कुणी हे फाटक

उत्थान पतनांच्या धाग्यांनी
बाधलेली आम्ही सर्व सावज
काळ टिपतो प्रत्येकाला
करीत नाही आवाज

विलास जैन

# श्रावण

असा असतो श्रावण
थांबते जेव्हा अन्नासाठी
प्राण्याची आणि पक्ष्याची वण वण
धरती जेव्हा हिरवा शालू नेसून
आकाशाची वाट पाहते प्रत्येक क्षण

चोहीकडे हिरवळ पाहून
मनात उठते प्रेमाचे वादळ
आणि प्रेम विरांच्या स्वप्नांना
मिळते येथे सवड

निसर्ग असतो आपल्या पूर्ण यौवनात
मुले नाचती खेळती हिरव्या कुरणात
देव देवता येथूनच करतात व्रतवैकल्याची सुरवात
नदी, नाले, झरे पहा कसे झुळझुळ वाहतात

रिप रिप पाऊस आणतो अंगावर शहारे
झाडे झुडपे म्हणतात आमच्या संग गाणे गा रे
आनंद वाढतो प्रत्येकाच्या मनात
सूर्यनारायण म्हणतो मी लपतो तुम्ही मला शोधा रे

विलास जैन

# भिकारी

मी भिकारी होतो पैशाने
पण राजा होतो मनाने

मी घेरलो गेलो होतो
अडीअडचणीने
पण थकलो नव्हतो
काबाड कष्टाने

आजपर्यंत भरभरुन
दिले नाही लक्ष्मीने
पण वाटत गेलो
उदार हृदयाने

कमकुवत केले
जेव्हा संकटाने
सामोरे गेलो
उदार दृष्टीकोनाने

वेढलो गेलो जेव्हा
दु:खद विचाराने
सोडवले प्रश्न
निसर्गाच्या सान्निध्याने

डुंबत होतो जेव्हा जेव्हा
असुरक्षा आणि भितीने
तरलो होतो तेव्हा
सुविचाराच्या एका काडीने

वरदान दिले आहे
सरस्वतीने
उपचार करत गेलो
जीवनाचा शब्दाने

विलास जैन

# निशिगंध

निशिगंधाला दिवसाची
गरज नसते
रात्रच त्याच्याकरीता
सर्व काही असते


दिवस ढळता ढळता
उमलतो हा निशिगंध
सारी रात्र अंधारातच
बहरतो दरवळतो सुगंध

पहाट होता होता
मावळतो हा निशिगंध
अंधाराची सर्व प्रहरे
जगणे शिकवतो निशिगंध

जीवनाच्या अंधारात सुहास
पसरवणे शिकवतो निशिगंध
फक्त प्रकाशाचीच अपेक्षा
न करावी सांगतो निशिगंध

निशिगंधाच्या उमलण्याने
रात्रही सोपी जाते
निशिगंध शिकवतो दु:खातही
जीवन चांगले जाते

विलास जैन



NEW ERA'S
SELF
HELP

## म्हातारा

मी थरथरणारा
म्हातारा
सांग देशिल का
तू मला सहारा

नको देऊ तू
मजला पैसा अडका
असो माझा शर्ट
बघ हा मळका

मलाच द्यावा सर्व
वेळ नाही अपेक्षा
म्हणत नाही होते
आहे माझी उपेक्षा

जीवनाच्या मावळत्या वेळी वाटते
मिळावा आपल्याचा संग
काही वेळ त्यांनी बोलण्यात
आपल्याशी व्हावे दंग

बघा कशी ही जीवनाची विडंबना
जे रडत होते खाद्यांवर माझ्या फिरण्या
त्यांचाच सहवास मिळावा
म्हणून या विनवण्या

बघितले सुख दु:ख श्रीमंती गरिबी
मी या जीवनात
वाटते उपयोग घ्यावा
या अनुभवांचा कोणी या जगात

विलास जैन



# प्रिय ताईस

तू भवानी, तू काली
तुच सकल जनाची माता
थांबव स्वत:ची अवहेलना
आणि अत्याचार आता

तू रमाई, तू सावित्री
तुच झाशीची राणी लक्ष्मीबाई
तोड बंधन लाचारीचे
तुझी आहे खूप पुण्याई

तुझी ही ममता अन् करुणा
समजू नको असमर्थ
शौर्य आणि विश्वास जागव
दाव याचा खरा अर्थ

रडू नको उठ बघ
वाट नसते सदैव अनुकूल
जिद्द अन् ध्येय तुझे
जिंकुन देईल परिस्थिती प्रतिकुल


खाणे-पिणे, रडणे-कुढणे
हेच जीवन नाही
ज्ञानाचा तू दिवा पेटव
सुसंस्कृत कर जीवन ताई


विलास जैन





NEW ERA'S SELF HELP

## आमचे मराठी व हिंदी भाषिक समाज उपयोगी साहित्य
## निराश व्यक्तीला प्रोत्साहीत करण्यासाठी प्रेरणात्मक
## सुविचार, शेरो शायरी, दोहे








## हे कार्य नाही क्रांती आहे




**शब्दांमृत®(हिंदी)**

जीवनाकडे बघण्याचा
दृष्टीकोन देणारा
कविता संग्रह






**शब्दांमृत®(मराठी)**


मराठी भाषिक
समाज उपयोगी साहित्य
निराश व्यक्तीला
प्रोत्साहीत करण्याकरीता
३९ कवितांचा संग्रह


हे कार्य नाही क्रांती आहे

आमचे हिंदी भाषीक समाज उपयोगी साहित्य लहान मुलांच्या
मनावर संस्कार घडविण्याकरीता २५ कवितांचा संग्रह
**नव निर्माण**®चे चार भाग








## हे कार्य नाही क्रांती आहे

## शब्दांमृत® (हिंदी)

**हिंदी भाषिक समाजपयोगी साहित्य**
**निराश व्यक्तीला प्रोत्साहीत करण्यासाठी**
**प्रेरणात्मक २५ कवितांचा दोन नवप्रकाशित संग्रह**




हे कार्य नाही क्रांती आहे

# आभार

त्या सर्वांचे जे
दुसऱ्यांसाठी चांगले आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
तत्पर आहेत...
चांगले होण्यासाठी सदैव
प्रार्थना करतात...
चांगले करण्याकरीता
भरपूर मेहनत करतात...
चांगल्या व्यक्तीची मनापासून
प्रशंसा करतात...
आणि प्रत्येक वेळी चांगल्या
कामामध्ये
तन मन धन
देण्यासाठी तयार असतात..



**आपणा पासुन मला प्रेरणा मिळते**

**विलास जैन**

# माझी ओळख



आज पर्यंत नाही
केली कुणाची फसवणूक
शुद्ध आणि सात्विक
होती माझी वागणूक
निसर्गाची करेल सेवा
तुमची करमणूक
जिवणांचे आनंद लुटून
काढेल मृत्युची
विजयी मिरवणूक
धन्यवाद..!

आपला विनम्र
विलास जैन

किंमत : रु. १००/-

हे कार्य नाही क्रांती आहे